# जपानी पुष्परचना - भाग ४

जपानी पुष्परचनांचे अनेक प्रकार आहेत. निसर्गामध्ये विविध प्रकारची झाडे, पाने, फुले आपण बघतो. कधी सरळ वाढणारी झाडे तर कधी असंख्य फांद्या असणारे अवाढव्य असे वृक्ष, छोटी छोटी झुडपे, गवत, वेली, पाण्यात उगवणाऱ्या वनस्पती, असंख्य प्रकारची विविध रंगांची, गंधांची, आकारांची फुले ! निसर्गाची ही विविधता आपल्याला अगदी आश्चर्यचकित करून टाकते. अश्या या नैसर्गिक रित्या वाढणाऱ्या पाना-फूल-झाडांचा स्वभाव विचारात घेऊन हा निसर्ग घरामध्ये आणण्याचा प्रयत्न पुष्परचनांच्या माध्यमातून केला जातो.

जपानमध्ये पुष्परचना ही कला शिकवणारी व त्याचा प्रसार करणारी अनेक घराणी आहेत. त्यांपैकी इकेनोबो स्कूल हे सर्वात जुने घराणे. मी स्वतः गेली २५ वर्षे इकेनोबो स्कूलची अभ्यासक आहे. या पुष्परचनांचा अभ्यास करताना मी निसर्गाशी तर जोडली गेलेच पण अनेकांशी मैत्रीचे धागे गुंफले गेले.

यावेळी आपण 'Less is more' या संकल्पना सांगणाऱ्या अगदी छोट्या आणि अगदी कमीतकमी पाने फुले वापरून केलेल्या अत्यंत नाजूक अशा ‘ मिनिएचर ’ पुष्परचनांचा आस्वाद घेणार आहोत. या रचना ६"×८" या चौकटीमध्ये बसणाऱ्या असतात. या रचना करतानाही रंगसंगती, नाजूक फुलापानांचा वापर, रचनेचा समतोल या गोष्टींचा विचार केलेला असतो.



रचना १ मध्ये भातुकलीमधील पिटुकली तांब्याची भांडी वापरली आहेत. ग्लॅडीओलाचे एखादे फूल, मनी प्लॅन्ट व फर्नची छोटी पाने, पांढरे नाजूक बेबीज ब्रेथ (Gypso) वापरले आहे. दोन्ही भांडी मिळून एक

रचना आहे. दोन्ही भांड्यांमधील फुलापानांची मांडणी व दिशा एकमेकांशी जुळणारी आहे. जणू दोन जिवाभावाच्या मैत्रिणी एकमेकांशी हितगुज करताहेत. त्याच्या हसण्या-बोलण्यातून वातावरणात सर्व दिशांना आनंद, उत्साह, व प्रसन्नता पसरत आहे.



रचना २ मध्ये ४-५ छोटे कप पुष्पपात्र म्हणून वापरले आहेत. केशरी रंगाची झेंडूची फुले, पांढरे स्टॅटिस व सोनेरी रंगाची नाजूक तार वापरली आहे. झेंडूची फुले रचनेमध्ये खूप कमी वेळा वापरली जातात. या रचनेमागची माझी कल्पना सांगते. एकमेकांशी  घट्ट नाते असलेले, गप्पा मारणारे, नात्याचे बंध जपणारे आनंदी कुटुंब मला दिसते आहे. सोनेरी तारा त्यांचे एकमेकांशी जुळलेले धागे दाखवत आहेत.

रचना ३ मध्ये छोटे मातीचे मडके वापरले आहे. एकच गुलाबी जर्वेराचे फूल, आईसक्रीम वेलाची नाजूक फांदी व शेवंतीची पाने वापरली आहेत. गुलाबी फूल आपल्याला सांगते आहे - मी एकटा असलो तरी आनंदी, समाधानी आहे. हिरव्या पानांची आणि नाजूक आईसक्रीम वेलाची सोबत मला पुरेशी आहे.



लॉकडाउनमध्ये 'Less is more' हा अनुभव सगळ्यांनी घेतला आहे. पुष्परचना करताना मला ही हे खूप जाणवले. आता रचना कशा करणार ? फुले कशी मिळणार हा प्रश्न पडला नाही. आजूबाजूच्या निसर्गात असणारे एखादे फूल, पाने, वाळलेल्या काड्या, गवत, शेंगा याचाही कलात्मक उपयोग करून हा आनंद सहज मिळवता येतो.

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**

(M.Sc. M.Phil. Chemistry)

व्हाईस प्रेसिडेंट, इकेनोबो इकेबाना, पुणे शाखा

e-mail : asdssd@gmail.com